यवतमाळ दि. मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से.°	२४ से.°

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक लोकसूत्र

वर्ष - पाचवे • अंक १८१ • किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित



श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग

प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ

G.N.M. (3 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य

A.N.M.(2 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता

P.B. BSC NURSING
पात्रता : GNM

B.Sc. Nursing
4 वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40

ANM/GNM/B.Sc.(N)
शासन निर्णयानुसार शिष्यवृत्ती लागू



अधिक महितीकरीता संपर्क
टिप : शासकीय निकषानुसार स्कॉलरशिप लागू ANM, GNM व BASIC B.Sc. (नर्सिंग) करिता
9561537762, 9130645861

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime

एसटी बसच्या अपघातात इसम जखमी

यवतमाळ : भरधाव वेगातील महामंडळाच्या एसटी बसने दिलेल्या धडकेत इसम गंभीर जखमी झाला. अपघाताची ही घटना १५ नोव्हेंबरला सकाळी ७.३० वाजता दिग्रस तालुक्यातील तुपटाकळी येथे घडली. दुर्गा शिवा देवरे (४२) रा. तुपटाकळी, ता. दिग्रस असे फिर्यादीचे नाव आहे. तर एमएच ०७/सी ९४०० या एसटी बसचा चालक असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. तर शिवा दत्ताजी देवरे (४५) रा. तुपटाकळी असे जखमीचे नाव आहे. फिर्यादी दुर्गाचा पती शिवा याला महामंडळाच्या एमएच ०७/सी ९४०० या क्रमांकाच्या बसचालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून ठोस मारली. या अपघातात शिवा जखमी झाला. तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी बसचालकाविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

हजारोंचा गुटखा पकडला

यवतमाळ : शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ मानवी आरोग्यास घातक आहे. त्याउपरही सुगंधित तंबाखू, पानमसाला व गुटख्याची सर्रास हेराफेरी केली जाते. दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाने दुचाकीस्वाराला पकडून त्याच्याकडून ५५ हजार ७७० रुपयांच्या तंबाखूजन्य पदार्थांचा साठा पकडला. ही कारवाई २४ सप्टेंबरला दुपारी १२.३० वाजता पुसद येथील वालतूर रोडवरील हनुमान मंदिराजवळ करण्यात आली. जगदीश पंढरीनाथ कापसे (२६) असे फिर्यादी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकाऱ्याचे नाव आहे. तर शेख जुबेर शेख असद (२६) रा. जांबबाजार असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी वसंतनगर पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

अशोकनगरात घरफोडी

यवतमाळ : कुणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घराच्या दाराचा कुलूपकोंडा तोडत आत प्रवेश केला. बेडरूममधील कपाटातील एक लाख १० हजार ९५८ रुपयांचे सोन्याचे दागिने व एक लाख २० हजार रोख रक्कम असा एकूण दोन लाख ३० हजार ९९८ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घरफोडीची ही घटना १० नोव्हेंबरच्या सकाळी १० तर १५ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजताच्या दरम्यान आर्णी रोडवरील अमृत गार्डनच्या पाठीमागे असलेल्या अशोकनगर प्लॉट नं. २७ मध्ये घडली. डेव्हिड वामनराव जाधव (४४) रा. अशोकनगर, प्लॉट नं. २७ असे फिर्यादीचे नाव आहे. तक्रारीवरून अवधूतवाडी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

विषबाधेचे सात बळी, फवारणीची दोघांना विषबाधा, कृषी आयुक्तालयाला एसपींचा अहवाल, कीटकनाशक विषबाधेवर प्रशासनाचा फोकस

कीटकनाशक कंपन्या बेलगाम

केशव सवळकर

यवतमाळ : कापसावरील बोंडअळ्यांच्या नियंत्रणासाठी हतबल ठरलेल्या शेतकऱ्यांनी तीव्र कीटकनाशकांची कॉकटेल फवारणी केल्याने जिल्ह्यात २०१७मध्ये जुलै ते ऑक्टोबरदरम्यान फवारणी विषबाधेचे तब्बल २२ शेतकरी, शेतमजूर बळी गेले होते. विदर्भात तब्बल ५० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. शिवाय जिल्ह्यात ८०० हून अधिक शेतकरी व मजुरांना फवारणी विषबाधेने घेरले होते. दरम्यान, यंदा ऑक्टोबर महिन्यातील अहवालानुसार फवारणी विषबाधेचा फटका दोघांना बसला असून स्वयंप्रेरणेने विष प्राशन करून सात जणांनी मृत्युला कवटाळल्याचेही पुढे आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे आजही जिल्ह्यात काही कीटकनाशक कंपन्या बेलगाम असून कृषी अधीक्षकांसह त्यांची गुणनियंत्रण यंत्रणा गाढझोपेत असल्याचे बोलले जात आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या स्वाक्षरीनिशी १३ नोव्हेंबरला पुण्याच्या कृषी आयुक्तालयातील मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांना ऑक्टोबर महिन्यातील फवारणी विषबाधा अहवाल पाठविण्यात आला आहे. प्रामुख्याने जिल्ह्यात जुलै ते ऑक्टोबर २०१७ दरम्यान कीटकनाशकांच्या फवारणी दरम्यान झालेल्या विषबाधेने २२ शेतकरी, शेतमजुरांचा बळी गेला होता. विदर्भात ५० हून अधिक मृत्युमुखी पडले होते. जवळपास ८०० हून अधिक शेतकरी व मजुरांना विषबाधेमुळे रुग्णालयात दाखल करावे लागले होते. यापैकी अनेकांना तात्पुरती किंवा दीर्घकालीन दृष्टीसमस्या आणि मज्जासंस्थेचा त्रास सहन करावा लागला. कीटकनाशकांच्या फवारणीदरम्यान


संग्रहित

कुठलीही सुरक्षा कीट न वापरल्याने विषाचे फवारणी दरम्यान काही तुषार श्वसनसंस्थेसह त्वचेच्या संपर्कातून थेट रक्तात भिनले. पोलो-डायफेनथियूरॉनसारख्या काही प्रतिबंधित कीटकनाशकांचा वापरही यामागे कारणीभूत असल्याचे नंतरच्या तपासात समोर आले होते. दिवसभर कोणतीही विश्रांती किंवा सुरक्षेची काळजी न घेता शेतात सलग फवारणी * पान ४ वर

न्यायालयाने ओढले होते ताशेरे

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने स्वत:हून सुमोटो दखल घेत राज्य शासनाला नोटीस बजावली होती. इतकेच नव्हे तर नागपूर उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकांवर झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने कृषी विभागाच्या हलगर्जीपणावर ताशेरे ओढले होते. फवारणीत मोनोक्रोटोफॉस, ऑक्सिडेमेटॉन-मिथाईल, प्रोफेनोफॉस आणि डायफेनथियूरॉन (पोलो) यासारख्या लाल आणि पिवळ्या लेबलच्या अत्यंत विषारी कीटकनाशकांचा वापरही शेतकऱ्यांच्या हातून झाल्याने कृषी विभागाची कार्यपद्धती नागडी झाली होती.

चौकशी समित्यांची क्लिनचिट

२०१७ मधील कीटकनाशक विषबाधेने संपूर्ण देश हादरून गेला होता. या घटनेनंतर राज्य शासनासह केंद्र शासन, कृषी व आरोग्य विभागासह राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही गंभीर दखल घेतली होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीसाठी तत्कालीन गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव सुधीर श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय विशेष तपास पथक नेमले होते. या समितीत कृषी, आरोग्य आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश होता.मात्र, कोणत्याही अधिकाऱ्यांना दोषी न ठरविता त्यांना क्लिनचिट देण्याचा प्रकारही घडला.

मुदतबाह्य कीटकनाशकांच्या विक्री

समितीच्या अहवालामध्ये अनेक कीटकनाशक विक्रेत्यांनी परवान्याशिवाय किंवा मुदतबाह्य व अत्यंत विषारी रसायनांची विक्री केल्याचे पुढे आले होते. शेतकऱ्यांना कोणत्याही तांत्रिक सल्ल्याशिवाय तीन ते चार कीटकनाशकांचे मिश्रण करून ते पिकांवर फवारणीसाठी वापरण्यास प्रवृत्त केले गेले होते. केंद्र सरकारच्या केंद्रीय कीटकनाशक मंडळाची तज्ज्ञांची समिती जिल्ह्यात आली होती. चिनी बनावटीचे हायप्रेशर पंप फवारणीसाठी वापरल्याने कीटकनाशकांचे सूक्ष्म तुषार हवेत पसरून श्वासावाटे शरीरात जात होते. मात्र, कीटकनाशक कंपन्यांवर काय कारवाई झाली, हे पुढे येऊ शकले नाही.

फवारणीचे अन्य दुष्परिणाम घातक

पॅन इंडिया अर्थात पेस्टिसाइड ॲक्शन नेटवर्क या संस्थेचे संस्थापक डॉ. डी. नरसिम्हा रेड्डी यांनी कीटकनाशकांचे पर्यावरणासह मानवीय आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचे संशोधन केले आहे. मध्यंतरी त्यांनी स्वित्झर्लंडच्या न्यायालयातही कीटकनाशक विषबाधेचे प्रकरण एका प्रख्यात कंपनीविरुद्ध दाखल केले. त्यांच्या मते कीटकनाशक फवारणीने फवारणी करणाऱ्यांच्या लैंगिक आरोग्यावरही परिणाम झाल्याचे बोलले जाते. अनेकांना नंपुसकत्व आल्याचा त्यांचा दावा होता. पर्यावरणावरही अत्यंत घातक परिणाम कीटकनाशकांमुळे होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

मेडिकल कॉलेजमध्ये कक्ष

कीटकनाशक फवारणी विषबाधेचे प्रकरण २०१७ मध्ये प्रचंड गाजले होते. दरम्यान, स्थानिक वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात या भीषण संकटानंतर टॉक्सिकोलॉजी/इन्टेंसिव्ह केअर सपोर्ट हा विशेष विषबाधा कक्ष उघडण्यात आला होता. कीटकनाशकांच्या विषबाधेवर मात करण्यासाठी ॲण्टी डॉटस् आणि औषधसाठा उपलब्ध करून दिला होता. ज्यामध्ये ॲट्रोपिन आणि प्रॅलिडॉक्झाईम या औषधांचा साठाही ठेवण्यात आला होता. डॉक्टरांना विशेष प्रकारच्या रासायनिक विषबाधेच्या रुग्णांचे निदान आणि उपचार जलदगतीने करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे व प्रशिक्षणही दिले होते. जेणेकरून न्युरॉलॉजिकल व श्वसनाच्या समस्येवर तातडीने नियंत्रण मिळविता येईल, अशी सोय केली होती.

वसुलीसाठी महावितरणची मोहीम तीव्र, साडेतीन हजार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

महावितरणची १८७ कोटींची वीजबिल थकबाकी

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर लघुदाब वीज ग्राहकांकडे १८७ कोटी रुपयांचे वीजबिल थकले आहे. त्यामुळे या रकमेच्या वसुलीसाठी महावितरणकडून विशेष मोहीम राबविली जात असून, या मोहिमेदरम्यान बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या परिमंडळातील तीन हजार ५७२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे.

वीजबिलाची वसुली करणे हा महावितरणचा उद्देश असून, ग्राहकांवर कारवाई करणे अपेक्षित नाही. मात्र, वीजबिलांचा भरणा न झाल्यास नाइलाजास्तव वीजपुरवठा खंडित करण्यासारखी कारवाई करावी लागते. ही कटू कारवाई टाळण्यासाठी ग्राहकांनी आपली चालू तसेच थकीत वीजबिले वेळेत भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले * पान ४ वर



या जिल्ह्यात पुरवठा खंडित

वीजबिल वसुली मोहिमेला गती देताना महावितरणने वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या तीन हजार ५७२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील दोन हजार ८८९, तर यवतमाळ जिल्ह्यातील ६८३ ग्राहकांचा समावेश आहे.

वीजबिल भरण्यासाठी ऑनलाइन सुविधा

वीज ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी महावितरणने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. महावितरणच्या अधिकृत वीजबिल भरणा केंद्रांसह संकेतस्थळावरून, महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे, मोबाईल वॉलेट तसेच विविध ऑनलाइन सुविधांच्या माध्यमातून ग्राहकांना वीजबिलाचा भरणा करता येतो. त्यामुळे ग्राहकांनी वीजपुरवठा खंडित होण्याची वेळ येऊ न देता आपली चालू व थकीत वीजबिले तातडीने भरावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

हप्तासंस्कृतीने 'खाकी'चा धाक संपुष्टात, हॉटेल-ढाब्याआडून अमली पदार्थांची नशा

आर्णीत अवैध जुगाराचे अड्डे फोफावले



राहुल वानखडे

आर्णी : रेतीतस्करीसह अमली पदार्थांच्या हेराफेरीने आर्णी तालुका चर्चेत असतो. अनैतिक मानवी व्यापाराचे प्रकारही काही हॉटेल व ढाब्यांच्या आडून आंबट शौकिनांसाठी चालतात. आता तर तालुक्यात अवैध जुगारांचे अड्डेच फोफावले आहेत. इतकेच नव्हे तर सुगंधित तंबाखू व गुटखातस्करीचेही मोठे नेटवर्क या तालुक्यात सक्रिय झाले आहे.

नागपूर-तुळजापूर महामार्गावरील शाळेमागील शेतात शेडखाली झन्ना-मन्ना आणि १३ पत्त्यांचा डाव सुरू असल्याची स्थानिकात ओरड आहे. 'सबको मॅनेज किया, हमको किसका डर!' अशी मगरूरी काही अवैध धंदेचालक करत आहेत. आर्णी शहरातही अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढल्याची स्थिती आहे. नागपूर-तुळजापूर महामार्गावरील एका शाळेच्या मागील शेतात शेडखाली चक्क झन्ना-मन्ना, एक्का-बादशाह आणि १३ पत्त्यांचा जुगार सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, हा डाव खुलेआम सुरू असल्याची चर्चा असताना संबंधित पोलीस यंत्रणेला याची माहिती नाही का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. सदर जुगाराचा अड्डा सर्वांना मॅनेज करूनच चालवला जातो, अशी चर्चा आहे. जुगार भरवणारे काहीजण तर 'हमने सबको मॅनेज किया, हमको किसका डर!' असे रोखठोक बोलत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा ठाकला आहे. अवैध धंदेचालकांच्या या वक्तव्यामागील सत्य काय, हे तपासातूनच स्पष्ट होणार आहे. जर अशाप्रकारे शेतातील शेडखाली मोठ्या प्रमाणात जुगाराचे डाव सुरू असतील, तर पोलिसांच्या गस्तीचा आणि कायद्याच्या धाकाचा प्रश्न निर्माण होतो. संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी करून जुगार अड्डा चालवणाऱ्यांवर तसेच त्यांना संरक्षण देणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई होणार का, की हा जुगाराचा डाव असाच सुरू राहणार, असा सवाल आर्णीकर विचारत आहेत.आता पोलिस प्रशासनाने या चर्चेची गांभीर्याने दखल घेऊन सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

झन्ना-मन्नासह १३ पत्त्यांचा डाव

गुटखा तस्करीला बळ कुणाचे ?

आर्णी शहरासह ग्रामीण भागात प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व गुटखा तस्करीचे नेटवर्क चालविले जाते. एफडीएसारख्या यंत्रणेला तुकाराम मुंढेसारखे आयुक्त असताना यवतमाळ विभागातील काही अधिकारी त्यांच्या कर्तव्यकठोर प्रतिमेचा लाभ उठवून हप्तासंस्कृतीत लिप्त झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे एफडीएसह पोलिसांची यंत्रणाही आर्णी तालुक्यातील गुटखा तस्करीवर गांभिर्याने कारवाई करत नाही. एकंदरीत या गुटखा तस्करीला बळ कुणाचे, हा सवाल आहे.

ढाबे अन् हॉटेल्स शंकास्पद

मध्यंतरी एका ढाब्यावर डोढा पावडर हे अमली पदार्थ पकडण्यात आले होते. एका हॉटेल-ढाब्याच्या आडून आंबटशौकिनांसाठी देहविक्रयाचा अड्डाही चालविला जात असल्याचे पुढे आले होते. नागपूर-तुळजापूर महामार्गावरील काही हॉटेल व ढाब्यांच्या आडून आजही अनेक अवैध धंदे सुरू आहेत. त्यामुळे गृहखात्यातील वरिष्ठांनीच याची दखल घेणे गरजेचे आहे.

जिल्ह्यात 'खनिज माफियांची' दहशत, १४ कोटींचा दंड आकारूनही तिजोरीत अवघे २ कोटी!, तब्बल ११ कोटी ७८ लाखांची वसुली थकीत

गौण खनिज तस्करीचा आलेख वधारला

केशव सवळकर

यवतमाळ : जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीचा सुळसुळाट सुरू असून, निसर्गसंपदेची सर्रास लूट करणाऱ्या तस्करांपुढे जिल्हा प्रशासन हतबल झाल्याचे धक्कादायक वास्तव आहे. १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यातील १६ तालुक्यांत अवैध उत्खननाची केवळ २६० प्रकरणे उघडकीस आली असून, त्यापोटी १३ कोटी ८४ लाख २८ हजार ४०० रुपयांचा दंड आकारला आहे. मात्र, प्रशासनाच्या तिजोरीत अवघे दोन कोटी सात लाख दोन हजार ६०० रुपये इतकीच तुटपुंजी वसुली झाली आहे.

जिल्ह्यात गौण खनिज तस्करी जणू अधिकृत झाली की काय, अशी


संग्रहित

अवस्था आहे. महसूलसह खनिकर्म व पोलीस यंत्रणांचे तस्करांसोबतचे साटेलोटे जगजाहीर आहेत. प्रत्येक नदीभागातील तालुक्यात हप्तासंस्कृती रुजली आहे. ट्रक, ट्रॅक्टर, टिप्परचे दर ठरले आहेत. अघोषित या दरानुसार वसुलीचे प्रत्येक तालुक्यात एजंट नेमले आहेत. केवळ मोजक्या * पान ४ वर

या तालुक्यातही स्थिती वाईट

यवतमाळ मुख्यालयातही २६ प्रकरणांत ३७ लाख १८ हजार दंड आकारला. मात्र, १४ लाख ३६ हजार थकीतच आहेत.एकीकडे केवळ कळंब तालुक्याने ५ प्रकरणांत १३ लाख २५ हजार दंडापैकी १३ लाख १९ हजार वसूल करत वसुलीत आघाडी घेतली आहे. मात्र, याच तालुक्यातून प्रचंड रेतीतस्करीही चालत असल्याचे वास्तव आहे. रेतीच्या साठेबाजीकडेही प्रशासनीक दुर्लक्ष आहे.

वसुलीतील तफावत मोठी

सर्वाधिक थकबाकी नेर तालुक्यात आहे. ९ प्रकरणांत ४ कोटी ८४ लाख ४७ हजारांचा दंड आकारला गेला, मात्र, केवळ १ लाख ६१ हजार वसूल झालेत. तब्बल ४ कोटी ८१ लाख ७९ हजार थकीत आहेत. घाटंजी-१६ प्रकरणांत २ कोटी ४० लाख १२ हजारे दंड, १ कोटी ८८ लाख ७२ हजार वसुली बाकी आहे. राळेगाव -२६ प्रकरणांत १ कोटी ७९ लाख ५५ हजार दंडापैकी केवळ १२ लाख ६७ हजार वसूल झाले. १ कोटी ६७ लाख १५ हजार थकीत आहेत.महागाव- २३ प्रकरणांत १ कोटी १६ लाख ६६ हजार दंडापैकी १ कोटी ०३ लाख ३७ हजार, तर वणी-१९ प्रकरणांत ८२ लाख १२ हजार दंडापैकी ७८ लाख ०५ हजार वसुली प्रलंबित आहे. केळापूर- ५५ लाख ४१ हजारांपैकी ४६ लाख ०७ हजार , दिग्रस- ३९ प्रकरणांत ६२ लाख ९७ हजांपैकी ४६ लाख ३० हजार आणि पुसदमध्ये ३५ प्रकरणांत ३९ लाख ०८ हजार पैकी १३ लाख ४० हजार अद्याप तिजोरीत जमा झालेले नाहीत.

ही कारवाई म्हणजे हिमनगाचे टोक

जिल्ह्यातील सर्वच नदीपात्रे आणि डोंगरदऱ्यांमधून रात्रंदिवस रेती, मुरूम आणि दगडाचे बेसुमार अवैध उत्खनन सुरू असताना प्रशासनाने सहा महिन्यांत पकडलेली २६० प्रकरणे ही 'हिमनगाचे केवळ एक टोक' मानली जात आहेत. विशेष म्हणजे, पंधरवड्याची (१५ ते ३० सप्टेंबर) आकडेवारी तपासली असता संपूर्ण जिल्ह्यात केवळ २७ प्रकरणे नोंदवली गेली, तर आर्णी, बाभूळगाव, केळापूर, महागाव, उमरखेड, दारव्हा आणि नेर या सात तालुक्यांत एकही नवीन प्रकरण उघडकीस आलेले नाही. प्रत्यक्षात या भागात अवैध वाहतूक जोरात सुरू असताना प्रशासकीय यंत्रणेचे डोळे बंद कसे, असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

कठोर कारवाई का नाही ?

प्रत्येक तालुक्यांत कोट्यवधींचा महसूल बुडत असताना महसूल व पोलीस यंत्रणेकडून तस्करांवर कठोर जप्तीची किंवा मालमत्ता जप्त करण्याची कारवाई होताना दिसत नाही. परिणामी, खनिज माफियांचे मनोबल वाढले असून शासनाचा कोट्यवधींचा महसूल पाण्यात जात आहे. कठोर कारवाई का नाही, हा जनतेचा सवाल आहे.

अँड द जर्नी बिगिन्स

डिसेंबर १९१६ चा तो सुळासारखा थंडीचा कडाका. उत्तर भारतातील लखनौ शहर दाट धुक्याची चादर ओढून सुस्तावले होते, पण लखनौचे रस्ते मात्र देशभरातून लोटलेल्या स्वातंत्र्यप्रेमींच्या उसळत्या समुद्राने गजबजले होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाची रणधुमाळी सुरू होणार होती. राजकीय पटलावर वैचारिक वादळांचे घोंघावणे सुरू होते, कोणाला रक्ताच्या क्रांतीचा मार्ग खुणावत होता, कोणाला कायदेशीर सुधारणांचे मृगजळ हवे होते, तर कोणाच्या मनी 'पूर्ण स्वातंत्र्याची' धगधगणारी आग पेटली होती. अशाच एका स्फोटक आणि ऐतिहासिक वातावरणात इतिहासाचा प्रवाह बदलून टाकणाऱ्या दोन महाशक्तींची ऐतिहासिक भेट होण्याची वेळ आली होती. एकीकडे सत्य आणि अहिंसेच्या अफाट शक्तीने ब्रिटिश साम्राज्याला हादरवून सोडणारे मोहनदास करमचंद गांधी, तर दुसरीकडे देशाच्या राजकारणात नव्याने उदयाला येत असलेले, पाश्चात्त्य उच्च शिक्षणाने भारलेले, अथांग वाचन आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले तरुण जवाहरलाल नेहरू. २६ डिसेंबर १९१६ लखनौच्या चारबाग रेल्वेस्थानकाचा परिसर. वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षातील तरुण जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्यापेक्षा वीस वर्षांनी मोठे असलेले मोहनदास करमचंद गांधी प्रथमच एकमेकांना भेटले. या भेटीपूर्वी नेहरूंचे आयुष्य एखाद्या राजेशाही थाटात गेले होते. मोतीलाल नेहरूंच्या अत्यंत संपन्न आणि विलासी घरात वाढलेले, हॅरो स्कूल आणि केंब्रिज विद्यापीठासारख्या जगातील सर्वोच्च संस्थांमध्ये शिक्षण घेतलेले, इंग्लिश संस्कृतीचा व कायद्याचा सखोल अभ्यास असलेले ते उच्चविद्याविभूषित तरुण होते. त्यांच्या अंगावर ब्रिटनच्या सरंजामशाहीची आणि आधुनिकतेची छाप होती. याउलट, गांधीजी साधे धोतर, खादीचे वस्त्र, हातात काठी आणि चेहऱ्यावर विलक्षण शांतता घेऊन उभे होते. दोघांच्या जीवनशैलीत, वेशभूषेत आणि विचारांच्या अभिव्यक्तीत जमीन-अस्मानाचा फरक होता,पण या बाह्य फरकांच्या पलीकडे जाऊन, दोघांच्या हृदयात भारताच्या पारतंत्र्याची आणि गुलामगिरीच्या वेदनेची आग तळमळत होती.



१९१६ च्या लखनौ अधिवेशनापूर्वी काँग्रेस पक्षात जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले होते, ज्यांची मोठी फूट १९०७ च्या सुरत अधिवेशनात जगजाहीर झाली होती. ब्रिटिशांविरुद्ध नेमका कोणता मार्ग स्वीकारावा, यावरून दोन्ही गटांमध्ये तीव्र मतभेद होते. पण, याच लखनौ अधिवेशनात लोकमान्य टिळक आणि इतर दिग्गज नेत्यांच्या प्रयत्नांमुळे हे दोन्ही गट तब्बल नऊ वर्षांनी पुन्हा एकत्र आले, ज्याला ऐतिहासिक लखनौ करारात खूप मोठे स्थान मिळाले. अशा या कमालीच्या संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या पार्श्वभूमीवर गांधी आणि नेहरू यांची पहिली भेट झाली. एका बाजूला काँग्रेसमधील जुन्या जाणत्या मवाळ-जहाल राजकारणाचा तो मिटअप होता, तर दुसरीकडे गांधींच्या तळागाळातील सत्याग्रहाच्या विचारांचा आणि नेहरूंच्या आधुनिक विचारांचा मिटअप होता. ज्याने पुढील काळात संपूर्ण स्वातंत्र्यलढ्याला एकसंध आणि एक नवी दिशा दिली. नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात या पहिल्या भेटीची आठवण काढताना लिहिले आहे की, दक्षिण आफ्रिकेतील संघर्षांमुळे तरुणांमध्ये गांधीजींविषयी प्रचंड आदर होता, मात्र त्यावेळी ते अनेक तरुणांना काहीसे वेगळे, दूरचे आणि राजकारणापासून अलिप्त वाटत होते, पण जसा काळ पुढे सरकला, तशी गांधीजींच्या विचारांची खरी ताकद नेहरूंसहित तरुणवर्गावर खोलवर उमटू लागली.

काही व्यक्तींची महानता त्यांच्या शब्दांत नसून त्यांच्या अस्तित्वात असते. गांधीजींच्या बाबतीत नेमके हेच सत्य होते. त्यांच्या साधेपणामागे एक अफाट सामर्थ्य होते, त्यांच्या शांततेत संघर्षाची भाषा होती आणि त्यांच्या अहिंसेत महासत्तेला हादरवून सोडण्याची ताकद होती.

त्यांनी भारतीय राजकारणाला पूर्णपणे नवीन वळण दिले. देशातील शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी आणि समाजातील उपेक्षित घटकांना थेट स्वातंत्र्यलढ्याच्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांच्या विचारांनी केले. साहजिकच, नेहरूंना या नव्या राजकीय शक्तीचे जबरदस्त आकर्षण वाटू लागले. १९१७ च्या चंपारण सत्याग्रहाने या नात्याला आणखी एक महत्त्वपूर्ण कलाटणी दिली. बिहारमधील शेतकऱ्यांच्या अन्यायाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाचे हत्यार उपसले. एकीकडे ब्रिटिश सत्तेची क्रूर दडपशाही आणि दुसरीकडे निःशस्त्र शेतकऱ्यांच्या वेदना या संघर्षात गांधीजींनी अहिंसेची खरी ताकद जगाला दाखवून दिली. नेहरूंना त्यावेळी लख्ख जाणीव झाली की, स्वातंत्र्याची ही लढाई केवळ सभागृहांतील भाषणांनी किंवा कागदी ठरावांनी जिंकता येणार नाही त्यासाठी थेट जनतेच्या मनात उतरावे लागेल, त्यांच्या दुःखाशी एकरूप व्हावे लागेल. याच काळात नेहरूंच्या विचारांत मोठे परिवर्तन घडू लागले. ऐषआरामाच्या वातावरणातून बाहेर पडून ते भारतीय सामान्य जनतेच्या वास्तवाशी जवळ आले. शेतकऱ्यांच्या झोपड्यांतील अंधार, गरिबांचा संघर्ष आणि ब्रिटिश राजवटीचा अन्याय त्यांच्या मनाला अस्वस्थ करू लागला. गांधीजींच्या सहवासाने त्यांच्या राजकीय जाणिवांना एक नवी आणि व्यापक दिशा दिली. मात्र, गांधी आणि नेहरू यांचे नाते केवळ 'गुरु आणि शिष्य' या चौकटीत बसणारे नव्हते. ते दोन अगदी भिन्न विचारविश्वांचे प्रतिनिधित्व करत होते. गांधीजींचा दृढ विश्वास ग्रामस्वराज्य, स्वदेशी, साधेपणा आणि नैतिक मूल्यांवर होता, तर नेहरूंच्या मनात विज्ञान, औद्योगिकीकरण, आधुनिक शिक्षण आणि समाजवादी विचारांची ओढ होती. साहजिकच, अनेक मुद्द्यांवर त्यांच्यात तीव्र मतभेद होत असत, पण या मतभेदांनी कधीही त्यांच्या नात्यात कटुता येऊ दिली नाही. उलट, परस्परांच्या विचारांचा सखोल आदर राखून त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी आयुष्यभर एकत्र काम केले. १९२९ च्या ऐतिहासिक लाहोर अधिवेशनात नेहरू काँग्रेसचे अध्यक्ष झाले आणि 'पूर्ण स्वराज्याचा' ठराव संमत झाला. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री रावी नदीच्या तीरावर तिरंगा फडकवण्यात आला. स्वातंत्र्याची घोषणा आता केवळ स्वप्न राहिली नव्हती, तर ती संपूर्ण भारताची प्रतिज्ञा बनली होती. या संपूर्ण प्रवासात गांधीजींचे मार्गदर्शन आणि नेहरूंचे नेतृत्व यांची एक अद्भुत सांगड घातली गेली. १९३० चा मिठाचा सत्याग्रह असो, सविनय कायदेभंग असो वा १९४२ चे 'भारत छोडो' आंदोलन असो प्रत्येक निर्णायक टप्प्यावर या दोघांच्या सहकार्याची मोहोर उमटली. ब्रिटिश सत्तेने दोघांनाही वारंवार तुरुंगात डांबले. तुरुंगाच्या भिंतींनी त्यांच्या शरीरांना रोखले असेल, पण त्यांच्या स्वातंत्र्याच्या विचारांना कधीच बांधून ठेवता आले नाही. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ते गांधीजींच्या प्रत्येक मताशी सहमत नसले तरी त्यांच्याविषयीचा अथांग आदर त्यांनी कधीही कमी होऊ दिला नाही. दुसरीकडे, गांधीजींनाही नेहरूंच्या आधुनिक विचारसरणीचे आणि तरुण पिढीवरील त्यांच्या अफाट प्रभावाचे महत्त्व अचूक ठाऊक होते. या परस्पर समजुतीमुळेच त्यांचे नाते भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे एक सुवर्णपान ठरले.

अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. शतकांच्या संघर्षाला यश आले. देशाच्या पहिल्या पंतप्रधानपदाची कठीण जबाबदारी जवाहरलाल नेहरूंनी स्वीकारली, पण स्वातंत्र्याच्या या आनंदाच्या क्षणी गांधीजी सत्तेच्या राजकारणापासून दूर, फाळणीच्या हिंसाचारात शांतता प्रस्थापित करण्यासाठी धडपडत होते. वेगवेगळ्या भूमिकांमध्ये असले तरी दोघेही एकाच भारतासाठी अहोरात्र झटत होते. ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींची हत्या झाली. ती धडकणारी बातमी ऐकून संपूर्ण देश सुन्न झाला. नेहरूंनी जेव्हा रेडिओवरून देशाला साद घातली, तेव्हा त्यांचे शब्द होते: "आपल्या जीवनातील प्रकाश निघून गेला आहे आणि सर्वत्र अंधार पसरला आहे." ते शब्द एका पंतप्रधानाचे नव्हते, तर आपल्या लाडक्या मार्गदर्शकाला गमावलेल्या एका व्यथित सहप्रवाशाचे होते. गांधीजींच्या जाण्याने नेहरूंच्या आयुष्यातील एक मोठा आधार हरपला; परंतु गांधीजींनी दिलेली मूल्ये आणि विचार आयुष्यभर त्यांच्या राजकीय प्रवासाचा दीपस्तंभ बनून राहिले. आज मागे वळून पाहताना प्रकर्षाने जाणवते की, इतिहास नेहमी तलवारींच्या आवाजानेच घडतो असे नाही, कधी तो दोन महान व्यक्तींच्या विचारांच्या मिलनातूनही घडतो. लखनौच्या त्या छोट्याशा भेटीने भारताला दोन भिन्न पण परस्परपूरक व्यक्तिमत्त्वे दिली. एकाने देशाला सत्याग्रहाची अफाट शक्ती दिली, तर दुसऱ्याने स्वतंत्र भारताच्या भविष्याची आधुनिक स्वप्ने पाहिली. एका हातात काठी होती, तर दुसऱ्याच्या मनात भविष्याचा नकाशा होता. एकाच्या पावलांनी जनतेला संघर्षाची दिशा दिली, तर दुसऱ्याच्या विचारांनी राष्ट्रनिर्मितीचा मार्ग शोधला. या महापुरुषांचा वारसा आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात एका अमर तेजासारखा तेवत आहे.

संकल्प गोबाडे
8411072228



सोनिया बिलॉंगिंग: हंगामा है क्यों बरपा...

सोनिया गांधी यांचे Belonging: A Journey of Love हे ५४४ पानांचं आत्मचरित्र १० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रकाशित झालं. हे पुस्तक खूप वैयक्तिक आहे, असं सोनिया गांधी यांनी स्वतः म्हटलं आहे. स्वतःच्या आयुष्याबद्दल लिहिणं सोपं नव्हतं, असं त्या म्हणाल्या आहेत.



युद्धानंतरच्या इटलीमधलं बालपण राजीव गांधी यांच्याबरोबरची भेट, प्रेम आणि लग्न नेहरू-गांधी कुटुंबात सून म्हणून आलेला प्रवास इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या निधनानंतरचं दुःख आणि त्यातून राजकारणात आलेली ओढ प्रेम, कर्तव्य, नुकसान आणि भारतात आपलं स्थान शोधणं-हा संपूर्ण प्रवास म्हणजे त्यांच्या कुटुंबाच्या 'माणूसपणाला' दिलेली आदरांजली आहे. हे पुस्तक हार्डकव्हर आणि ई-बुक स्वरूपात आलं आहे, तर ऑडिओ आवृत्ती Penguin Random House ने प्रकाशित केली आहे. पहिल्या आवृत्तीत १,००,००० प्रती छापल्या गेल्या आहेत. प्रत्येक जण आपापल्या राजकीय चष्म्यातून या पुस्तकाची समीक्षा करीत आहेत. देशातील ज्येष्ठ पत्रकारांच्या नजरेत पुस्तकाची समीक्षा कशी आहे, हे वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या लेखाची उठा ठेव आहे. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर भाजप समर्थक आणि काँग्रेस विरोधकांनी टीकेची जी जोड उठविली आहे, त्याचा परामर्ष माझे पत्रकार मित्र पंकज शर्मा यांनी घेतला आहे. त्याचा सारांश वाचकांसाठी देत आहे. पंकज शर्मा लिहितात की, क़िताबें, कुछ कहना चाहती हैं; तुम्हारे पास रहना चाहती हैं...'। सफदर हाश्मी यांच्या कवितेतील ह्या ओळी ३७ वर्षांपूर्वी प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीच्या ओठांवर होत्या. सफदर यांच्या मृत्यूच्या दुःखद संदर्भात न जाता, मी ह्या ओळींचा उल्लेख यासाठी करत आहे, कारण जेव्हा सोनिया गांधींचं पुस्तक प्रकाशित झालं आणि नकारात्मक विचारसरणीने गदारोळ माजवायला सुरुवात केली, पुस्तकांना तुम्हाला काय सांगायचं आहे ते जर तुम्हाला ऐकायचं नसेल, तर ऐकू नका. जर पुस्तकांना तुमच्यासोबत राहायचं असेल आणि तुम्हाला त्यांना दूर ठेवायचं असेल, तर त्यांना तुमच्या मर्जीप्रमाणे मैलो दूर ठेवा, पण तुम्ही हे का नाही लिहिलं, ते का नाही लिहिलं, की तुम्ही कुदळ घेऊन घरातून पळून जायला हवं होतं? देशात किंवा जगात कुठेही, कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा विचारसरणीने दुसऱ्या कोणत्याही राजकारण्याच्या आत्मचरित्रावरून इतका क्षुल्लक राजकीय वाद निर्माण केल्याचं मला आठवत नाही. भारतीय जनता पक्ष आणि पक्षाचे समर्थक नेते सोनिया गांधींच्या पुस्तकावरून असा गदारोळ माजवत आहेत, जणू काही त्यांच्यावर सुमेरू पर्वत कोसळला आहे. भाजप-आरएसएसच्या अनेक लेखकांनीही आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यांच्यापैकी कोणाला कधी अशा वैयक्तिक टीकेला सामोरे जावे लागले आहे का? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अद्याप आपले आत्मचरित्र पुस्तकाच्या पानांवर उतरवले नाही, जनसंघाचे प्रमुख नेते दीनदयाळ उपाध्याय आणि श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी कधीही औपचारिक आत्मचरित्रे लिहिली नाहीत. दीनदयाळ यांच्या 'इंटीग्रल ह्युमनिझम' पासून 'व्हाय अनडिव्हायडेड इंडिया' पर्यंतच्या वैचारिक कार्यांवर सैद्धांतिक चर्चा होते, पण या कारणास्तव कोणीही त्यांच्यावर वैयक्तिक टीका करत नाही. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या मृत्यूनंतर त्यांच्या वैयक्तिक आठवणींमधील काही पाने 'लीव्हज फ्रॉम अ डायरी' या नावाने प्रकाशित झाली, पण कोणीही त्यांच्यावर वैयक्तिक टीका केली नाही. जनसंघ आणि भाजपचे सर्वात लोकप्रिय आणि प्रभावशाली नेते अटलबिहारी वाजपेयी यांनीही औपचारिक आत्मचरित्र लिहिले नाही, पण त्यांची भाषणे आणि वर्तमानपत्रे व मासिकांमधील लेख संकलित करणारी पुस्तके प्रकाशित होत राहिली. 'मेरी संसदीय यात्रा', 'ना दैन्यम ना चा पलायनम' आणि 'गठजोडन की राजनीती' यामधील त्यांच्या विधानांवर कोणी खंत व्यक्त केल्याचे किंवा 'अरेरे, त्यांनी हे का नाही लिहिले किंवा अरेरे, त्यांनी ते का लिहिले?' असे म्हटल्याचे तुम्हाला आठवते का? 'माय कंट्री, माय लाईफ' या पुस्तकात एल. के. अडवाणी यांनी आणीबाणी, रामरथयात्रा आणि केंद्र सरकारबद्दल अनेक खोट्या आणि खऱ्या गोष्टी लिहिल्या, पण विरोधी पक्षाने कोणताही गदारोळ केला नाही. जसवंत सिंग यांनी 'अ कॉल टू ऑनर'मध्ये कारगिल युद्ध आणि कंदाहार घटनेचे अतिरंजन केले, पण विरोधकांनी कोणताही गदारोळ केला नाही. शांता कुमार यांनी त्यांच्या आत्मचरित्रात अशा अनेक गोष्टी लिहिल्या आहेत, ज्यांचा विरोधक फायदा घेऊ शकले असते, पण त्यांनी तसे केले नाही. राम नाईक यांनी त्यांच्या 'चरैवेती! चरैवेती!' मध्ये इतके वाद निर्माण केले की विरोधकांनी ते फोडले असते, पण कोणीही तसे केले नाही. कलराज मिश्रा आणि तथागत रॉय यांच्या पुस्तकांवरही विरोधक गप्प राहिले. विजयाराजे शिंदे यांनी मनोहर माळगावकर यांच्या मदतीने लिहिलेल्या त्यांच्या आत्मचरित्रात आणीबाणीचा संक्षिप्त वृत्तांत दिला आणि काँग्रेसने त्यांच्या लिखाणाचे पद्धतशीरपणे विश्लेषण केले असते, पण विजया राजे यांच्यावर कोणतेही वैयक्तिक हल्ले झाले नाहीत. प्रा.बलराज मधोक यांनी त्यांच्या पुस्तकात अटल बिहारी यांच्या विरोधात इतके काही लिहिले की, विरोधी पक्षांनी त्यांची रोज निंदा केली असती, पण कोणीही मर्यादा ओलांडली नाही. दत्तोपंत ठेंगडी, मा. गो. वैद्य, मोरोपंत पिंगळे आणि लक्ष्मणराव इनामदार यांनी आत्मचरित्रे लिहिली नसतील, पण त्यांची अनेक पुस्तके वादाच्या दलदलीत टाकता आली असती, पण कोणीही तसे केले नाही. एन. गोविंदचार्य आणि शेषाद्री चारी यांनी त्यांच्या आठवणींवर असंख्य लेख लिहिले आणि नंतर ती पुस्तके म्हणून प्रकाशित केली, पण विरोधी पक्षाने कधीही त्यांच्यावर वैयक्तिक टीका केली नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) नेत्यांनी आत्मचरित्र लिहिण्याची कोणतीही परंपरा नाही. 'व्यक्ती महत्त्वाची नाही, तर विचारधारा आणि संघटना महत्त्वाची आहे' अशी सबब सांगितली जाते.

सरसंघचालक केशव बळीराम हेडगेवारजी आणि माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांनी आत्मचरित्रे लिहिली नसली तरी, मधुकर दत्तात्रय उपाख्य बाळासाहेब देवरस, राजेंद्र सिंह उपाख्य रज्जूभैया आणि कुप्पल्ली सीतारामय्या सुदर्शन यांच्या भाषणांचा संग्रह असलेली पुस्तके प्रकाशित झाली आहेत. बाळासाहेबांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत लिहिलेल्या आठवणींचे एक पुस्तकही प्रकाशित झाले. रज्जूभैया यांनी आपल्या आठवणी ऑडिओ स्वरूपात रेकॉर्ड करून घेतल्या होत्या. या रेकॉर्ड केलेल्या आठवणींवर आधारित, आमचे मित्र रतन शारदा यांनी 'द लाईफ अँड टाईम्स ऑफ रज्जूभैया' हे पुस्तक लिहिले. त्यावर कोणीही कधीच आक्षेप घेतला नाही. पण सोनिया गांधी यांचे Belonging: A Journey of Love हे आत्मचरित्र प्रकाशित होताच सत्ताधाऱ्यांकडून गदारोळ झाला. अशा लोकांनी सभ्यतेच्या सर्व मर्यादा उघडपणे ओलांडणारे मुद्दे उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची जोरदार बदनामी केली जात आहे. राजकीय विश्लेषणाशी संबंधित परिच्छेदांचा निषेध केला जात आहे. पुस्तकातील प्रांजळपणा, तटस्थता आणि निःस्वार्थपणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे, सत्ताधारी गटाची ही प्रतिक्रिया स्वाभाविक आहे, कारण सोनियांच्या आत्मचरित्राने जागतिक अभिजात साहित्यकृतींमध्ये आपले स्थान मिळवले आहे. त्यांच्या पुस्तकाला आतापर्यंत लिहिलेल्या सर्वात उल्लेखनीय आत्मचरित्रांपैकी एक म्हणून गौरवले जात आहे. 'बिलॉन्गिंग' हे पुस्तक प्रत्येक विक्री केंद्रावर आपोआपच बेस्टसेलर ठरले आहे. ॲन फ्रँक, माया अँजेलो, नेल्सन मंडेला, फ्रेडरिक डग्लस, बेंजामिन फ्रँकलिन, बराक ओबामा, महात्मा गांधी किंवा सोनिया गांधी यांनी त्यांच्या कथा इतक्या शुद्धतेने लिहिल्या तरी, विक्रीचे विक्रम मोडले जाणे अटळ आहे. सत्य हे आहे की, अशा साहित्यकृती संपूर्ण समाजाची मने जिंकतात. आणि जेव्हा जेव्हा असे घडते, तेव्हा राजकीय सत्तेचा पायाच हादरू लागतो.

न. मा, जोशी
८८०५९४८९५१



असं आवरा रागाला...

रागाच्या क्षणी आपण दुसऱ्याला हरवण्याचा प्रयत्न करतो करतो, पण नकळत स्वतःचंच सुख, समाधान आणि नातेसंबंध गमावून बसतो. रागावर विजय मिळवायचा असेल, तर आधी स्वतःला ओळखायला नको का?

एका अरुंद पुलावरून एकावेळी एकच व्यक्ती जाऊ शकत होती. समोरासमोर एक साधू आणि एक टिंगलखोर माणूस आले. दोघांमध्ये आधी जाण्यावरून वाद झाला. साधूने संतापाच्या भरात त्याला राक्षस होण्याचा शाप दिला. राक्षस होताच त्या व्यक्तीने सर्वप्रथम साधूलाच खाऊन टाकले! क्षणिक रागातून साधूने स्वतःचेच नुकसान करून घेतले. ही गोष्ट काल्पनिक असली, तरी त्यातील संदेश मात्र आपल्या प्रत्येकाच्या आयुष्याला लागू पडतो. कारण रागाच्या भरात आपणही सर्वप्रथम स्वतःचेच नुकसान करतो. उसाच्या रसाच्या मशीनमध्ये ऊस टाकला की सर्वप्रथम त्याचा गोडवा मशीनलाच अनुभवायला मिळतो. मात्र त्याच मशीनमध्ये दगड टाकले, तर नुकसानही तिचेच होते. आपल्या मनाचेही असेच आहे. आपण मनात प्रेम, संयम आणि सकारात्मक विचार पेरतो की राग, द्वेष आणि अहंकाराचे दगड टाकतो, यावर आपल्या आयुष्याचा गोडवा अवलंबून असतो.

राग नेमका कोणावर असतो?

राग म्हणजे केवळ ओरडणे किंवा चिडचिड करणे नव्हे. आपल्या अपेक्षांना धक्का बसला, अहंकार दुखावला किंवा मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत, की रागाचा उद्रेक होतो. विशेष म्हणजे, एकाच चुकीसाठी आपण मोठी व्यक्ती किंवा बॉससमोर शांत राहतो, पण तीच चूक आपल्या मुलाने, पत्नीने किंवा हाताखालील व्यक्तीने केली तर संतापतो. याचा अर्थ राग नेहमीच अनियंत्रित नसतो. अनेकदा तो व्यक्तीच्या स्थानानुसार आपण व्यक्त करतो. मग प्रश्न असा की, आपण रागावर नियंत्रण ठेवू शकत नाही की काही व्यक्तींसमोर ते नियंत्रण सोडून देतो?

रागाच्या भरात बोललेले शब्द परत घेता येत नाहीत. म्हणून कोणताही कठोर शब्द उच्चारण्यापूर्वी स्वतःला एक प्रश्न विचारा, 'हेच शब्द मी लेखी स्वरूपात देऊन त्याखाली सही करू शकेन का?' जर उत्तर नाही असेल, तर ते शब्द बोलण्यापूर्वी थांबणेच शहाणपणाचे नाही का?

रागाचा मूळ स्रोत

समोरच्याने आपल्याला धक्का दिला म्हणून राग येतो; पण तोच धक्का देणारी व्यक्ती दृष्टिहीन किंवा दिव्यांग असल्याचे समजताच रागाची जागा सहानुभूती घेते. घटना तीच असते, बदलतो तो आपला दृष्टिकोन! त्यामुळे प्रत्येक वेळी समोरच्याला दोष देण्याऐवजी स्वतःच्या अपेक्षा, गैरसमज आणि अहंकार तपासणे आवश्यक नाही का?

राग आल्यावर तीन गोष्टी करता येईल : एक थांबा, दुसरी शांतपणे श्वास घ्या आणि तिसरी मग बोला. स्वतःला विचारा– मला राग का आला? माझी कोणती अपेक्षा पूर्ण झाली नाही? समोरच्याची बाजू समजून घेतली का? मी कोणत्या भूमिकेतून प्रतिक्रिया देत आहे? हे काही क्षणांचे आत्मपरीक्षण अनेक नाती तुटण्यापासून वाचवू शकते.

रागाचे डबल नुकसान

रागाच्या भरात नात्यांना तडा देणे ही पहिली चूक. चूक लक्षात आल्यानंतरही अहंकारापोटी माफी न मागणे ही दुसरी! माफी मागितल्याने माणूस लहान होत नाही. उलट नात्यांमधील त्याचे मोठेपण सिद्ध होते. नात्यांपेक्षा अहंकार मोठा मानायचा की अहंकारापेक्षा नाती, हा निर्णय प्रत्येकाने स्वतः घ्यायला नको का? आपल्या आहाराचा आणि संगतीचाही मनावर परिणाम होतो. संतुलित, पौष्टिक आहार, नियमित व्यायाम, ध्यानधारणा आणि सकारात्मक संगत मनःस्वास्थ्यासाठी उपयुक्त ठरतात. मात्र रागावर नियंत्रण मिळवण्याची खरी सुरुवात स्वतःच्या विचारांची आणि प्रतिक्रियांची जबाबदारी स्वीकारण्यातून होते. महाभारतातील अर्जुन आणि दुर्योधनाचे उदाहरणही याचाच बोध देते. दुर्योधनाने कृष्णाच्या सैन्याची निवड केली, तर अर्जुनाने कृष्णाला सारथी म्हणून मागितले. एकाने बाह्य सामर्थ्याला प्राधान्य दिले, तर दुसऱ्याने योग्य मार्गदर्शनाला. तसेच आपल्या जीवनातही केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा मिळवण्यापेक्षा योग्य विचारांचा सारथी असणे अधिक महत्त्वाचे आहे.

आजपासून एक संकल्प करूया!

राग आला की तत्काळ प्रतिक्रिया देणार नाही. चूक झाली तर माफी मागण्यास संकोच करणार नाही. दुसऱ्याला बदलण्यापेक्षा स्वतःच्या विचारांमध्ये बदल घडवून आणू. दिवसातील काही मिनिटे आत्मपरीक्षण आणि ध्यानासाठी राखून ठेवू. राग जिंकण्यात मोठेपणा नाही. रागावर विजय मिळवण्यात खरे मोठेपण आहे. समोरच्याला हरवून मिळणारा आनंद क्षणिक असतो, पण स्वतःच्या अहंकारावर विजय मिळवून मिळणारे समाधान चिरंतन असते. चला, आजपासून रागाला नव्हे, तर संयमाला आपल्या स्वभावाचा भाग बनवूया. शब्द जपुया, नाती जपूया आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतःमधील आनंदाचा स्रोत पुन्हा शोधूया!

विलास शा.गोहणे
9881816588



टिप : या लेखांमध्ये प्रकाशित होणारी मते लेखकांची आहे. त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

थोडक्यात

'वनजागर' कार्यशाळेतून वनहक्क कायदे व अधिकारांची जनजागृती



यवतमाळ : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त तसेच जनजातीय गौरव सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा व पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समित्यांची क्षमता बांधणी आणि वनहक्क कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित 'वनजागर कार्यशाळा' उत्साहात पार पडली. या कार्यशाळेला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आ. राजू तोडसाम, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री, अपर आयुक्त संदीप गोलाईत, पांढरकवडाचे प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे, पुसदचे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर, उपवनसंरक्षक अमित मिश्रा, उपवनसंरक्षक डॉ. बी. एन. स्वामी, दामिनी संजय राठोड, डॉ. आरती फुफाटे, जिल्हा समन्वयक सुनील सोसे यांच्यासह वनहक्क व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष, सरपंच आणि मोठ्या संख्येने आदिवासीबांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले की, क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जनजातीय गौरवदिनाचे औचित्य साधून आदिवासीबांधवांना वनहक्क कायदे, अधिकार आणि कायद्यातील विविध तरतुदींची माहिती व्हावी, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. वनहक्क समित्यांमध्ये सातत्याने एकाच व्यक्तीची नियुक्ती न ठेवता प्रशासनाने त्यामध्ये बदल करण्याबाबत लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले. १५ नोव्हेंबर हाच जनजातीय गौरव दिवस असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार राजू तोडसाम यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देत वनहक्क कायद्याची माहिती तळागाळातील आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतील, असे नमूद केले. तसेच नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी या कार्यशाळेच्या निमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. जिल्हाधिकारी विकास मीना म्हणाले की, सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समित्या अधिक सक्षम व्हाव्यात, वनहक्क कायद्याबाबत जनजागृती व्हावी आणि आदिवासी बांधवांना कायद्याने मिळालेल्या अधिकारांची सविस्तर माहिती व्हावी, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कायद्याची योग्य माहिती असल्यास त्याचा लाभ घेणे अधिक सुलभ होते. त्यामुळे कार्यशाळेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते 'वनजागर'पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच विविध महिला बचत गटांना लघुउद्योगासाठी अनुदानाचे धनादेश आणि घरकुल लाभार्थ्यांना धनादेश वितरीत करण्यात आले. तसेच विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवनियुक्त शिक्षकांना नियुक्ती पत्र वितरित करण्यात आले. यावेळी उपजिल्हाकधकारी पूनम अहिरे यांनी वनहक्क कायद्याच्या अनुषंगाने तसेच आदिवासी विकास विभागाच्या योजनांची माहिती अमोल मेतकर यांनी दिली. महिला बचतगटांचे स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद महिला आर्थिक विकास महामंडळ व उमेद अंतर्गत कार्यरत आदिवासी महिला बचतगटांचे स्टॉल उभारण्यात आले होते. त्याठिकाणी विविध प्रकारच्या वनोपजपासून निर्मित उत्पादने विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहे. या स्टॉलवरील उत्पादने खरेदी करून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वनहक्क कायद्याची माहिती, सामूहिक वनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि आदिवासी समाजाच्या अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

तीन दिवस पाणीपुरवठा बंद

यवतमाळ: यवतमाळ पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अंतर्गत वाघापूर टेकडी मुख्य संतुलन टाकी (एमबीआर) च्या स्लॅबचे लिकेज दुरुस्तीचे काम पूर्ण न झाल्यामुळे वाघापूर एमबीआर टाकी झोन अंतर्गत वैभव नगर, वाघापुर टेकडी, प्रिया रेसिडेन्सी, मेडीकल टाकी, विठ्ठलवाडी, बालाजी टाकी, विसावा टाकी, पॉलिटेक्नीक, चांदोरे नगर टाकी ९ उंच पाण्याच्या टाकीवरून होणारा पाणीपुरवठा १८ ते २० नोव्हेंबरपर्यंत तीन दिवस पूर्णपणे बंद राहील. तरी नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे उपविभागीय अधिकारी संजय उमाळे यांनी जनतेस आवाहन केले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचा माणुसकीचा दिवाळी उपक्रम



यवतमाळ : दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण असला तरी समाजातील दु:खितांच्या जीवनात आनंदाची ज्योत पेटवणे हीच खरी दिवाळी. या भावनेतून ग्रामपंचायत अधिकारी संघटना डीएनई १३६ तालुका शाखा राळेगावच्या वतीने शेळी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यात आली. शेतकरी कुटुंबावर आलेल्या दु:खाच्या प्रसंगी त्यांना आधार मिळावा आणि सणाच्या आनंदापासून हे कुटुंब वंचित राहू नये, या सामाजिक जाणिवेतून संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी कुटुंबाची भेट घेऊन छोटीशी आर्थिक मदत व सहकार्याचा हात पुढे केला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि संवेदनशीलतेचे दर्शन घडले. केवळ सण साजरे करण्यापेक्षा गरजू आणि दु:खितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे महत्त्वाचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. या उपक्रमाला ग्रामपंचायत अधिकारी गजानन भोयर, राजेश्वर ढगे, मनोज पानसे, विनोद उमरतकर, कांबळे, पिंगळे, वडे, राठोड, मडावी, राऊत यांच्यासह राळेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

• ३५वर्षीय मतिमंद मुलगा झाला पोरका, कवठा (बु.) येथे शेतकऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू

हृदयद्रावक! पित्याचे छत्र हरपले

पहिला मुलगा विजेच्या धक्क्याने गेला आता कुटुंबाचा आधारही हरपला

लोकसूत्र प्रतिनिधी

सावळी सदोबा :- आर्णी तालुक्यातील कवठा (बु.) गावावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. येथील शेतकरी दत्ताजी खुशालराव नखाते (७०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुपारी दुर्दैवी निधन झाले. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी शेतात राबणारा हा कष्टकरी शेतकरी अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेतील सर्वात वेदनादायी आणि काळीज चिरणारी बाब म्हणजे, या शेतकऱ्याच्या पश्चात ३५ वर्षीय मतिमंद मुलगा आहे. या निरागस मुलाच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र कायमचे हरपले आहे. आयुष्यभर ज्या वडिलांनी आपल्या मतिमंद मुलाला जपले, त्याच वडिलांचा आधार आता त्याच्यापासून हिरावला गेला आहे.काळाने या कुटुंबावर हा पहिलाच घाला घातला नाही. तर काही वर्षांपूर्वी त्यांचा पहिला मुलगा विजेच्या धक्क्याने मृत्युमुखी पडला होता. त्या जखमेतून कुटुंब सावरत असतानाच आता कुटुंबप्रमुखाच्या जाण्याने कुटुंब पूर्णपणे उघड्यावर आले आहे.शेतकरी म्हणजे केवळ जमीन कसणारा मजूर नव्हे तर तो आपल्या कुटुंबाचा कणा असतो, मुलांच्या स्वप्नांचा शिल्पकार असतो. दत्ता नखाते हेच या कुटुंबाचा आधार होते. घरातील कर्तापुरुष अचानक निघून गेल्याने कुटुंबावर दु:खाचा महाप्रलय कोसळला आहे. आता या मतिमंद मुलाचे होणार तरी काय? हा प्रश्न आज प्रत्येक सुज्ञ नागरिकाला आणि प्रशासनाला भेडसावत आहे. ज्या मुलाला स्वत:च्या दोन वेळच्या जेवणाचीही भान नाही, त्याच्या संगोपनाची, त्याच्या भविष्याची जबाबदारी आता कोण घेणार? या दु:खद प्रसंगी केवळ शोक व्यक्त करून, सांत्वनपर दोन शब्द बोलून चालणार नाही. प्रशासनाने तातडीने या निराधार कुटुंबाची दखल घ्यावी. या मतिमंद मुलासाठी आणि कुटुंबासाठी शासनाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, शेतकरी अपघात विमा तसेच दिव्यांगांसाठी असलेल्या योजनांचा लाभ तातडीने



मिळवून द्यावा, अशी मागणी संपूर्ण गावकऱ्यांमधून होत आहे. एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला नाही, तर एका मतिमंद लेकराचा आधार, एका कुटुंबाचा आधारवड हरपला आहे. या कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी समाज आणि प्रशासन एकत्र येईल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

शहीद सैनिकांच्या स्मारकासाठी जागा द्या

ग्रामसभेत ठराव घेऊन वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठवा फासेपारधी कर्मचारी संघटनेची मागणी

लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद : तालुक्यातील हनुमाननगर (कुंभारी) येथील भारतीय सैन्य दलाच्या आसाम रेजिमेंटमध्ये कार्यरत असलेले सैनिक प्रदीप मोहन राठोड यांचे २६ सप्टेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी गावात स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटनेने ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राठोड यांच्या पार्थिवावर २७ सप्टेंबर रोजी हनुमाननगर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले होते. देशसेवेत कार्यरत असलेल्या सैनिकाच्या स्मृती कायमस्वरूपी जतन व्हाव्यात आणि भावी पिढीला त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने स्मारक उभारण्याची मागणी केली आहे. यासाठी ग्रामपंचायत कुंभारीने स्मारकाकरिता योग्य जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच बांधकामासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याच्या दृष्टीने ग्रामसभेत ठराव पारित करून वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा, अशी विनंती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

संघटनेचे अध्यक्ष काश्मीर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहसचिव अनिल कालग्राम यांनी १३ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत प्रशासनाला हे निवेदन सादर केले. सैनिकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्मारक उभारण्याच्या या मागणीवर ग्रामपंचायत प्रशासन काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

आसेगावकर विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन



तीन दशकांतील आठवणींना उजाळा माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकारिणीची निवड

लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद : शालेय जीवनातील जुन्या आठवणी, मित्रांचा सहवास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला उजाळा देत श्रीराम आसेगावकर विद्यालयातील १९९० ते २००० या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येत शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

यावेळी माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकारिणीचीही निवड करण्यात आली. रविवारी दुपारी १२ वाजता विद्यालयात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर शाळेतील वर्गखोल्या, परिसर आणि जुन्या आठवणींशी निगडित ठिकाणांना भेट देत विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील खोड्या, एकत्र केलेला अभ्यास, शिक्षकांची शिस्त, क्रीडा स्पर्धा आणि स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर भेटलेल्या मित्रांमध्ये गप्पांची मैफल रंगली. काही काळासाठी सर्वजण पुन्हा शाळकरी वयात रमल्याचे चित्र पाहायला मिळाले. १९९० ते २००० या दशकात या विद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, कला, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रांत कार्यरत आहेत. विविध ठिकाणी विखुरलेल्या या माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकत्र आणणे हा स्नेहमेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे मुख्याध्यापक अतुल चिद्दरवार यांनी सांगितले. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. निश्चल नरसिंग, उपाध्यक्षपदी दिव्या हाके, तर सचिवपदी बबलू चव्हाण यांची एकमताने निवड करण्यात आली. मेळाव्याच्या मंचावर मुख्याध्यापक अतुल चिद्दरवार, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. दुधे आणि शैलेश पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ॲड. निश्चल नरसिंग, बबलू चव्हाण, जयंत राठोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. यासाठी अतुल चिद्दरवार आणि अश्विन पवार यांनी मार्गदर्शन केले.

आदिवासी समाजातील गुणवत्तेचा गौरव

भूमिका गेडामच्या क्रीडा भरारी पीएचडीधारक मरियम बेगम यांचाही सन्मान

पांढरकवडा : ग्रामीण, आदिवासी तसेच सर्वसामान्य कुटुंबांतील गुणवंतांच्या यशाला प्रोत्साहन देत त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा स्तुत्य उपक्रम युवा टायगर फोर्सच्या वतीने राबविण्यात येत आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करून नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

याच उपक्रमांतर्गत झटाळा येथील आदिवासी कन्या भूमिका गेडाम हिने सलग तिसऱ्यांदा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघात स्थान मिळवून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत सातत्य, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर तिने मिळविलेल्या या यशाबद्दल युवा टायगर फोर्सच्या वतीने तिचा गौरव करून अभिनंदन करण्यात आले. त्यानंतर आता शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या मरियम बेगम यांनी पीएच.डी. ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल शुक्रवार, १३ नोव्हेंबर रोजी त्यांच्या निवासस्थानी जाऊन युवा टायगर फोर्सच्या वतीने त्यांचा सन्मान व अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे परिसरातील विद्यार्थिनी आणि नव्या पिढीला उच्च शिक्षणाची प्रेरणा मिळणार आहे. खेळाच्या मैदानात भूमिका गेडामची भरारी आणि संशोधन व शिक्षण क्षेत्रात मरियम बेगम यांची गरुडझेप या दोन्ही यशांचा गौरव म्हणजे समाजातील गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याचा सकारात्मक संदेश आहे. गुणवंत कोणत्याही क्षेत्रातील असो, त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या यशाचा आदर्श इतरांसमोर ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, अशी भावना युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार आणि संयोजक अंकित नैताम यांनी व्यक्त केली. यावेळी आनंद वैद्य, मनोज भोयर, दिलीप गावंडे, राजू मोटेमवार, पडोळे, गणेश राऊत, अक्षय कट्टू, संजय औंधार्य, अनिस पोसवाल, गणेश बोरकुटे, सुनील कोपुलवार, श्रीकांत काळे, ताजुद्दीन काझी, साजिद शरीफ, मन्सूर आणि जुबेर पाशा यांच्यासह युवा टायगर फोर्सचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

मासेमार इसमाचा शंकास्पद मृत्यू

उमरी कापेश्वर येथील घटना विजेच्या धक्क्याने मृत्युची चर्चा

लोकसूत्र प्रतिनिधी

सावळी सदोबा : पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या उमरी (कापे) येथील ४५ वर्षीय मासेमार इसमाचा मासे पकडताना दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र, त्यांच्या मृत्युवर शंकेचे मळभ दाटले असून विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची चर्चाही पंचक्रोशीत रंगली आहे.

संजय नारायण बावणे (४५) हा नेहमीप्रमाणे पैनगंगा नदीवर मासे पकडण्यासाठी गेला होता. दुसऱ्या दिवशी संजयचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पुढे आली. ही घटना पैनगंगा नदीवर मराठवाड्यातील खंबाळा शिवारात घडल्याने हे प्रकरण मांडवी पोलिसांच्या हद्दीत आहे. संजयचा मृत्यू विजेच्या धक्क्याने झाल्याची चर्चा परिसरात सुरू असून, या घटनेमुळे उमरी (कापे.) परिसरात शोककळा पसरली आहे. माहितीनुसार, संबंधित मासेमार मासे पकडण्यासाठी गेला असतांना ही दुर्दैवी घटना घडली. मासे पकडताना विजेच्या संपर्कात आल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.रोजच्या उदरनिर्वाहासाठी मासेमारी करणाऱ्या व्यक्तीवर अशा प्रकारे काळाने घाला घातल्याने हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेमुळे मृताच्या कुटुंबीयांवर दु:खाचा



डोंगर कोसळला आहे. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मांडवी पोलीस तपास व शवविच्छेदन अहवालानंतरच घटनेमागील सत्य समोर येणार आहे. या घटनेची सखोल चौकशी करून मृत्यूचे नेमके कारण काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मृतकाच्या पश्चात पत्नी, दोन मुलं असा परिवार आहे.

दोन दशकानंतर पुन्हा फुलले मैत्रीचे विश्व

फुलसावंगी शाळेत २००६ च्या बॅचचे स्नेहसंमेलन

लोकसूत्र प्रतिनिधी

फुलसावंगी : काळ बदलला, प्रत्येकाच्या आयुष्याच्या वाटाही बदलल्या कुणी नोकरीत रमले, तर कुणी संसाराच्या जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त झाले. मात्र, शाळेतील मैत्री आणि आठवणी मनाच्या कोपऱ्यात कायम जिवंत राहिल्या. याच आठवणींना उजाळा देत फुलसावंगी येथील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात इयत्ता दहावी २००६ च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. तब्बल दोन दशकांनंतर भरलेल्या या शाळेत तब्बल ६० माजी विद्यार्थी पुन्हा एकदा एकत्र आले. या खास



सोहळ्याला तत्कालीन वर्गशिक्षक डी. बी. हातमोडे, एस. के. पेंटेवाड आणि ए. के. पांडे यांची विशेष उपस्थिती लाभली. २० वर्षांपूर्वी शिकवलेले विद्यार्थी आज कर्तृत्ववान झालेले पाहून शिक्षकही भारावून गेले. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रंगलेल्या या भेटीत जुन्या खोड्या, वर्गखोलीतील गमतीजमती आणि शिक्षकांचे संस्कार यावर दिलखुलास गप्पा रंगल्या. कार्यक्रमात आयोजित मनोरंजनात्मक खेळांमध्ये सर्वांनीच वयाचे भान विसरून बालपणीच्या उत्साहात सहभाग घेतला. हास्यविनोद आणि आनंदी क्षणांनी संपूर्ण परिसर भारून गेला. २० वर्षांपूर्वी निरोप घेताना पडलेला दुराव्याचा पडदा या स्नेहसंमेलनाने दूर केला. शाळा सुटली, शिक्षण संपले तरी मैत्रीचा धागा किती घट्ट असतो, याची अनुभूती देत या सोहळ्याने प्रत्येकाच्या मनात बालपण पुन्हा एकदा जिवंत केले.

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती

लोकसूत्र प्रतिनिधी

तैलचित्राच्या भव्य शोभायात्रेने वेधले लक्ष

सावळी सदोबा : आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अन्यायाविरुद्ध लढा उभारणारे महान क्रांतिकारक, जननायक क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती सावळी सदोबा व परिसरातील अनेक गावात मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात साजरी झाली.

आर्णी तालुक्यात येणाऱ्या सावळी सदोबा येथे या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. भारत सरकारने १५ नोव्हेंबर हा दिवस २०२१ पासून जनजातीय गौरव दिवस म्हणून घोषित केला असून, भगवान बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर



१८७५ रोजी झाला होता. २०२४-२५ हे वर्ष त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गौरव वर्ष म्हणून साजरे झाले, तर यंदाचे २०२६ हे वर्ष १५१व्या जयंती वर्ष म्हणून साजरे होत आहे. सावळी सदोबा येथे ग्रामपंचायत चौकातील भगवान बिरसा मुंडा यांच्या तैलचित्राचे व प्रतिमेचे पूजन करून जयंती कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बिरसा मुंडा यांच्या तैलचित्राची गावातून ढोल-ताशांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले आदिवासी संस्कृतीचा जागर. पारंपरिक वेशभूषा, आदिवासी महिलांचे सामूहिक नृत्य आणि पारंपरिक कलांच्या सादरीकरणातून आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती जिवंत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. आदिवासी महिलांनी पिवळ्या, हिरव्या आणि केशरी रंगांच्या पारंपरिक साड्या परिधान करून सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

नृत्यावर महिलांनी धरला ठेका...

पारंपरिक नृत्याच्या तालावर महिलांनी धरलेला ठेका आणि उत्साहामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. जयंतीनिमित्त युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, अभिवादन सोहळे आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे उपक्रम राबविण्यात आले.

अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा...

क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांनी अल्पायुष्यातच आदिवासी समाजामध्ये स्वाभिमान, एकता आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा निर्माण केली. जल, जंगल आणि जमीन या हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविला गेला आहे. ब्रिटिशांच्या अन्यायकारक सत्तेविरोधात त्यांनी उभारलेला लढा आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे.

पान १ वरून

कीटकनाशक कंपन्या ...

करणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना हा फटका बसला होता. दरम्यान कृषी विभागाने १२ ऑक्टोबर २०१७ रोजी एक परिपत्रक काढून दर महिन्याचा फवारणी विषबाधा व मृत्यू अहवाल कृषी आयुक्तालयाला देणे बंधनकारक केले होते. त्यावरून जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी ऑक्टोबर २०२६ या महिन्यातील फवारणी विषबाधेचा अहवाल गत तीन दिवसांपूर्वी १३ नोव्हेंबरला कृषी आयुक्तालयात पाठविला आहे. यामध्ये जिल्ह्यातील ३१ पोलीस ठाण्यांअंतर्गतची माहिती पाठविण्यात आली. मात्र, कीटकनाशक फवारणी विषबाधेचा फटका केवळ दारव्हा तालुक्यात दोघांना बसल्याचे आकडेच्यात नमूद आहे. तर दुसरीकडे स्वत:हून कीटकनाशक प्राशन करून मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा हा सात दर्शविण्यता आला आहे. त्यात दिग्रस तालुक्यात १, पुसद ग्रामीण २, पांढरकवडा १, राळेगाव १, वडकी १ तर महागाव तालुक्यात १ असे विषप्राशन करून मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आहे. कीटकनाशकांच्या विषबाधेवर गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

महावितरणची १८७ कोटींची ...

आहे. परिमंडळातील लघुदाब वीज ग्राहकांकडे असलेल्या एकूण १८७ कोटी रुपयांच्या देयकांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ७६ कोटी रुपये, तर यवतमाळ जिल्ह्यातील १११ कोटी रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे. अमरावती जिल्ह्यातील विभागनिहाय थकबाकीचा विचार करता अचलपूर विभागाकडे १८ कोटी ७० लाख, अमरावती ग्रामीण विभागाकडे १६ कोटी, अमरावती शहर विभागाकडे ३४ कोटी आणि मोर्शी विभागाकडे ७ कोटी ३० लाख रुपयांची वीज बिले थकीत आहेत. दुसरीकडे, यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा विभागाकडे १८ कोटी ३४ लाख रुपये, पांढरकवडा विभागाकडे २४ कोटी २५ लाख रुपये, पुसद विभागाकडे २९ कोटी ३९ लाख रुपये, तर यवतमाळ विभागाकडे ३८ कोटी ७१ लाख रुपयांची थकबाकी आहे.

गौण खनिज तस्करीचा आलेख ...

कारवाया दाखवून तस्करीचा हा गोरखधंदा बिनधास्तपणे चालविण्याची संस्कृती राजकीय नेत्यांच्या शिफारशीनुसारच अधिकारी जपत आहेत. प्रामुख्याने जिल्ह्यातील १६ तालुक्यात एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत अवैध उत्खननाची २६० प्रकरणे नोंदविल्या गेली. त्यात यवतमाळ २६ प्रकरणे असून बाभूळगाव ८, आर्णी ३५, कळंब ५, राळेगाव २६, मारेगाव ४, वणी १९, झरी ६, केळापूर १६, घाटंजी २३, महागाव १३, उमरखेड ९, पुसद ३९, दिग्रस ११, दारव्हा ५ तर नेर तालुक्यात ९ अशा प्रकरणांचा समावेश आहे. प्रामुख्याने यामध्ये १३ कोटी ८४ लाख २८ हजार ४०० रुपये दंड आकारण्यात आला. मात्र, वसुली केवळ दोन कोटी सात लाख २६० रुपये एवढी असून अद्यापही ११ कोटी ७८ लाख ५२ हजार ८०० रुपयांची मोठी रक्कम थकीत आहे. त्यामुळे कारवाईचा हा फार्स केवळ कागदावरच उरल्याचे स्पष्ट झाले आहे.

बनावट निविष्ठा विक्रीचा गोरखधंदा, **निविष्ठानिर्मितीतही सहभागाची शक्यता**

कळंबचे कृषी केंद्र गुन्हे शाखेच्या रडारवर

लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना बनावट सोयाबीनचे बियाणे विकणाऱ्या काही कृषी केंद्रात स्थानिक गुन्हे शाखेने धाडी मारल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्र संचालकांचे धाबे दणाणले आहे. निविष्ठा उद्योगात सहभाग घेणाऱ्या काही केंद्रांना गुन्हे शाखेच्या पथकाने रडारवर घेतल्याची माहिती असून सखोल चौकशी केल्यास मोठा घोळ पुढे येईल, अशी चर्चा आहे.

कळंब तालुक्यात अनेक कृषी केंद्रचालकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक सुरू आहे. चढ्या भावाने कृषी साहित्यांची विक्री केली जाते. बियाण्यांसह खते व कीटकनाशकाच्या गुणवत्तेबाबतही प्रचंड शंका आहे. अनेक केंद्रांमधून लिंकेजच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक होत असल्याचे आरोप आहेत. काही कृषी केंद्र संचालकांनी निविष्ठा उद्योगात पाळेमुळे रुजविली आहेत. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन बियाण्यासंह अन्य बनावट निविष्ठा विक्रीतून



शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कर्ज उचलून शेती कसली. मात्र, तालुक्यात शेकडो शेतकऱ्यांचे बियाणे उगवलेच नाही. काहीं शेतकऱ्यांच्या संपूर्ण जमिनी पडीत पडल्या. त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांनी कृषी केंद्रांसह कंपनी विरोधात तक्रारी केल्या. मात्र त्यावेळी शेतकऱ्यांना काही दिलासा मिळाला नाही. मात्र, काही शेतकऱ्यांनी पाठपुरावा कायम ठेवल्याने स्थानिक गुन्हे शाखेकडून आता तक्रारी प्राप्त झालेल्या कृषी केंद्राची झाडाझडती सुरू आहे. त्यामुळे बनावट बियाणे विकणाऱ्या कृषी केंद्र संचालकांसह कंपन्यावर कारवाईची टांगती तलवार आहे. एकंदरीत कृषी विभाग बीजी-३ सह बनावट बियाणे विक्रेत्यावर कारवाई करण्यास अपयशी ठरला आहे. मात्र, गुन्हे शाखेने चौकशी केल्यास यवतमाळातील एका खताच्या कारवाईचे धागेदोरे हाती घेऊन बरेच काही पुढे आणता येणार आहे.

कृषीची गुणनियंत्रण यंत्रणा फेल

कृषी विभागाची निविष्ठा गुणनियंत्रण यंत्रणा बियाणे, खते व कीटकनाशकांच्या गुणवत्तेवर नियंत्रण राखण्यात फेल ठरली आहे. मोहिमेवरील एका अधिकाऱ्याने हंगामाच्या कालावधीत बरीच माया गोळा केली आहे. हसासंस्कृतीत प्रवीण असलेल्या या अधिकाऱ्याने स्टेटच्या काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून बरेच गोलमाल केल्याची चर्चा आहे.

नगरपरिषदेची शववाहिका धूळखात

मानव सेवा समितीकडे सुपूर्द करण्याची मागणी



लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद: सार्वजनिक निधीतून नगरपरिषदेने खरेदी केलेली शववाहिका प्रत्यक्ष धूळखात पडली आहे. या वाहिनीचा गरीब व गरजू नागरिकांना अंत्यविधीसाठी उपयोग व्हावा हे अपेक्षित आहे. त्यामुळे यासाठी सदर शव वाहिनी पुसदच्या मानव सेवा समितीकडे जनहितार्थ सुपूर्द करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात मानव सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. नगरपरिषदेने नागरिकांच्या सुविधेसाठी नव्याने शववाहिका खरेदी केली असली, तरी तिचा प्रत्यक्ष वापर सुरू झालेला नसल्याचे म्हटले आहे. सार्वजनिक पैशातून खरेदी केलेल्या वाहनाचा नागरिकांना लाभ मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केला आहे. शहरातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेहाची वाहतूक करण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा प्रसंगी शववाहिका सेवा उपलब्ध होणे गरजेचे आहे. मानव सेवा समितीने ही जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शविली असून, आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून शववाहिका समितीकडे सुपूर्द करण्याची मागणी केली आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणीही केली आहे. सार्वजनिक निधीतून खरेदी केलेली शववाहिका शोभेची वस्तू न राहता नागरिकांच्या सेवेत असावी, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. निवेदनावर अरुण राऊत, जयानंद उबाळे, राजरत्न लोखंडे, गजानन तोडक, विजय बाबर आणि रवि बहादुरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

काय आहेत मागण्या ?

शववाहिकेची सद्यस्थिती आणि तिचा वापर सुरू न होण्यामागील कारणांची चौकशी करावी, वाहन खराब होण्यापूर्वी जनहितासाठी त्याचा वापर सुरू करावा, तसेच देखभाल, इंधन खर्च आणि सेवा शुल्क याबाबत स्पष्ट नियम निश्चित करावेत, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत. गरीब व गरजू नागरिकांना मोफत अथवा अत्यल्प दरात ही सेवा उपलब्ध करून देण्याची भूमिका समितीने मांडली आहे.

चिंचबर्डीतील शेतकऱ्याची आत्महत्या

लोकसूत्र प्रतिनिधी


सावळी (सदोबा) : नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. ही घटना पारवा पोलीस स्टेशन हद्दीतील चिंचबर्डी येथे घडली.

रोहिदास बाबूलाल जाधव (५०) असे मृतकाचे नाव आहे. रोहिदास जाधव यांच्या नावे ४ एकर शेती आहे. त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा सावळी सदोबा येथून सुमारे २ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. गेल्या काही दिवसांपासून नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे ते सतत चिंतेत होते. याच विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे. या



घटनेमुळे चिंचबर्डी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. हा या सर्कलमधील अवघ्या १३ दिवसांतील दुसरी तर या महिन्यातील चौथी आत्महत्येची घटना ठरली आहे. रोहिदास जाधव यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि दोन विवाहित मुली असा परिवार आहे. या प्रकरणी पारवा पोलिसात नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

भोजल्यात ६५ हजारांचा गुटखा पकडला



यवतमाळ : शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ मानवी आरोग्यास घातक असतानाही सुगंधित तंबाखू, पानमसाला व गुटख्याची सर्रास हेराफेरी करणाऱ्यास अखेर एफडीएने पकडले. दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाने ६५ हजार १२० रुपयांच्या तंबाखूजन्य पदार्थांचा साठा पकडला. ही कारवाई १५ नोव्हेंबरला सकाळी ११.५५ वाजता भोजला येथे करण्यात आली. सचिन प्रकाश नरवाडे (३१) असे फिर्यादी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकाऱ्याचे नाव आहे. तर प्रशांत सुभाष खराबे (२२) रा. भोजला असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी वसंतनगर पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

कीटकजन्य आजारांचा धोका बळावला,
राहटी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

तुंबलेल्या नाल्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

लोकसूत्र प्रतिनिधी

दिग्रस : राहटी गावातील अस्वच्छता, तुंबलेल्या नाल्या आणि वाढत्या डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परिसरातील आठ नागरिक आजारी पडल्याचा दावा करत त्यांच्या रक्त तपासणीचे अहवाल जोडून गणेश माणिकराव गव्हाणे यांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात बीडीओ पंजाब रणमले यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार राजू जाधव यांच्या घरापासून माणिक गव्हाणे यांच्या घरापर्यंतच्या नालीची अनेक वर्षांपासून साफसफाई झालेली नाही. नालीमध्ये गाळ व कचरा साचल्याने दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना आरोग्यविषयक त्रास सहन करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. यापूर्वी १४ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. अखेर १२ नोव्हेंबर रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीसोबत आठ नागरिकांचे रक्त तपासणी अहवाल जोडण्यात आले आहेत. संबंधित नागरिकांना ताप तसेच डेंग्यू, मलेरिया सदृश आजारांची लक्षणे व इतर आरोग्यविषयक त्रास झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. मात्र, या आजारांचा नालीतील अस्वच्छता किंवा डासांच्या प्रादुर्भावाशी नेमका संबंध आहे का, हे आरोग्य विभागाच्या तपासणीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीकडून कर वसूल केला जात असताना मूलभूत स्वच्छता सुविधांकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. आता वरिष्ठ अधिकारी या तक्रारीची कितपत दखल घेतात आणि प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम कधी राबवतात, याकडे राहटी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

फॉगिंगद्वारे प्रादुर्भाव रोखावा

पाच ते सहा दिवसांत नाली स्वच्छ करून बांधकाम करण्याची मागणी केली आहे. संबंधित नालीची पुढील पाच ते सहा दिवसांत संपूर्ण साफसफाई करून आवश्यक बांधकाम करावे, संपूर्ण राहटी गावात फॉगिंग करून डासांचा प्रादुर्भाव रोखावा, तसेच आठ नागरिकांच्या रक्त तपासणी अहवालांची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्या गणेश गव्हाणे यांनी प्रशासनाकडे केल्या आहेत.

नेरच्या बसस्थानकावर चोरट्याचा धुमाकूळ



यवतमाळ : कुणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी महिलेच्या पर्समधील रोख तीन हजार व अंदाजे ३८ ग्रॅम सोन्याचे दागिने असा दोन लाख ५२ हजार ३१३ रुपयांचा ऐवज लांबविला. ही घटना १५ नोव्हेंबरला दुपारी १.१० वाजता नेरच्या बसस्थानकावर घडली. राधा निकेश महल्ले (२५) रा. कोल्ही क्र. १, ता. बाभूळगाव, ह.मु. सुनील गावंडे यांचे घरी रा. पांढरी, ता. नेर असे फिर्यादीचे नाव आहे. या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

बळीराजाचे लक्ष आता मदतीच्या दुसऱ्या टप्प्याकडे

लोकसूत्र प्रतिनिधी

पुसद : तालुक्यातील शेतकरी अपुऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील पिके हातून गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. अशातच शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना सण साजरा करण्यासाठी पाच हजारांची मदत खात्यात जमा केली; परंतु या पाच हजारात दिवाळी कशी साजरी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला होता. भरीव मदतीची अपेक्षा असताना तुटपुंजी रक्कम जमा झाल्याने आता शासन दुसऱ्या टप्प्यात बळीराजा किती मदत करते, याकडे लक्ष लागले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन, कापूस व तूर हे तिन्ही पिके शेतकऱ्यांच्या हातुन गेली आहे. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पावसाने दडी मारल्याने या पिकांच्या उत्पन्नात घट होणार आहे. सोयाबीनच्या उताऱ्यात आधीच घट आली आहे. उत्पादन खर्चसुद्धा न निघाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. यातच पाण्याअभावी रब्बी हंगामही घेता येणार नसल्याने उत्पन्नाची तुटसुद्धा भरुन निघणार नाही. शासनाकडुन किमान ५० हजार रुपये हेक्टरी मदतीची अपेक्षा असताना दिवाळी साजरी करण्यासाठी केवळ पाच हजार रुपयांची मदत करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहे. शेतकऱ्यांना घरसंसाराचा गाडा हकलण्यासाठी पाठबळ म्हणून भरीव मदतीची शासनाकडुन आशा आहे. शासन या विषयावर किती खरे उतरते, हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

आर्थिक संकटाचे ढग दाटले

यंदा तरी पीकविमा मिळणार का ?

गतवर्षी यवतमाळ जिल्हा पीकविम्याच्या मदतीपासुन वंचित राहिला होता. याच कारणामुळे यंदाच्या खरीप हंगामात बहुतांश शेतकऱ्यांनी पीकविमा काढण्याकडे पाठ फिरविली होती; परंतु ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा काढला आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना पीकविमा केव्हा मिळणार, याची प्रतीक्षा आहे. शासनाने पीकविमा कंपनीला त्वरित निर्देश देऊन पीकविमा वितरीत करण्यास बाध्य करावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

हेक्टरी किमान ५० हजारांची मदत करावी : प्रकाश ठेंगे

यंदाचा दुष्काळ हा अत्यंत तीव्र असून शेतकरी पूर्णत: कोलमडला आहे. संपूर्ण खरीप हंगाम हातून गेल्याने शासनाने शेतकऱ्यांना दोन टप्प्यात किमान ५० हजारांची मदत करावी, अशी मागणी आरेगाव येथील शेतकरी प्रकाश ठेंगे यांनी दै. लोकसूत्रशी बोलताना केली.

माजी सरन्यायाधीशांचा विधी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीत स्थानिक अमोलकचंद महाविद्यालयात स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ यांच्या वतीने कायदा आणि न्यायशास्त्र या विषयावर विशेष संवाद कार्यक्रम रविवारी पार पडला. यावेळी न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी विधी विद्यार्थ्यांयोबत मनमोकळा संवाद साधला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा लोकमतचे चेअरमन डॉ. विजय दर्डा होते. यावेळी आ. बाळासाहेब मांगूळकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री, मंडळाचे सचिव सीए प्रकाश चोपडा, उपाध्यक्ष डॉ. ललित

विद्यार्थ्यांना केले प्रेरणादायी मार्गदर्शन



निमोदिया, ॲड. प्रवीण जानी, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेश मुनोत, अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड आदी उपस्थित होते. माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांना विधी विद्यार्थ्यांयोबत संवाद साधताना कायद्याच्या क्षेत्रात नैतिकतेचे महत्त्व विषद केले. व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांच्या कारकिर्दीत त्यांना आलेल्या अनुभवांची माहिती विधी विद्यार्थ्यांना देऊन प्रेरणादायी मार्गदर्शन केले. देशाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूरमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, अशी सूचना लोकमतचे चेअरमन डॉ. विजय दर्डा यांनी यावेळी केली. कार्यक्रमाचे संचालन योगीता बोरा यांनी तर आभार सीए प्रकाश चोपड़ा यांनी मानले.

वीज खांब उभारणीत भ्रष्टाचाराचा शॉक!

सिमेंटला पाणी नाही, खांब पडण्याच्या मार्गावर

लोकसूत्र प्रतिनिधी

सावळी सदोबा : ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या नावाखाली महावितरणकडून सुरू असलेल्या कामात मोठा घोळ पुढे आला आहे. सावळी सदोबा सर्कल अंतर्गत गेल्या अनेक महिन्यांपासून एका कंत्राटदाराला गाव फिडरचे काम देण्यात आले आहे. या कंत्राटदाराकडून सर्व नियमांना हरताळ फासत मनमानी पद्धतीने कामे केली जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

नवीन वीज खांब (पोल) उभारताना सिमेंट काँक्रिटीकरण केल्यानंतर त्याला मजबुतीसाठी



किमान ७ ते ८ दिवस नियमित पाणी देणे बंधनकारक असते. सिमेंटचे क्युरिंग होणे अनिवार्य ठरते. मात्र, सदर कंत्राटदाराने खांब उभा करून सिमेंट टाकून तिथून पळ काढल्याचे चित्र आहे. एकाही खांबाला पुन्हा पाणी देण्यात आलेले नाही. त्यामुळे हे खांब येत्या काही दिवसातच कमकुवत होऊन पडण्याची भीती असून, विजेची समस्या जैसे थेच राहणार आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे शासनाच्या निधीची उधळपट्टी होत आहे. खांब उभारताना रस्त्याची रुंदी, नागरिकांची येजा, शेतकऱ्यांची बैलगाडी-ट्रॅक्टर वाहतूक आणि भविष्यातील अतिक्रमण याचा विचार करणे अपेक्षित असते. मात्र, कुठेही पाहणी न करता, ग्रामपंचायत किंवा स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता, सोयीस्कर ठिकाणी खांब टाकण्याचे काम सुरू आहे. यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून अपघाताचा धोका वाढला आहे.

गुणनियंत्रण तपासणी अनिवार्य

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केवळ कंत्राटदाराच्या भरवशावर काम सोडून देणे कितपत योग्य आहे? प्रत्यक्ष साईटवर येऊन पाहणी केली जाते का? वर्क ऑर्डरप्रमाणे काम होत आहे का? याची तपासणी कोण करणार, असा सवाल आहे. महावितरणच्या गुणनियंत्रण यंत्रणेने कामाची तपासणी करावी, अशी मागणी आहे.

ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

कंत्राटदाराच्या सोयीसाठी गावकऱ्यांना त्रास का सहन करावा लागत असल्याचा संतप्त सवाल नागरिकांचा आहे. या प्रकरणाची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी. नियमबाह्य आणि निकृष्ट काम आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर काळ्या यादीत टाकण्यासह कठोर कारवाई करावी आणि ग्रामस्थांच्या तक्रारीचे निराकरण करावे, अशी मागणी सावळी सदोबा परिसरातील नागरिकांमधून होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com